रविवार
०१
मार्च २०२६

वर्ष १९ वे
अंक - ५२
पाने - ०६
किंमत - ०४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25


होळीच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा !









दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25



काजळे ज्वेलर्स


आजचे सोन्याचे भाव

| | |
|---|---|
| 22 कॅरेट हॉलमार्क दागिणे | = 1, 48, 400/- |
| 20 कॅरेट मणी | = 1, 34, 915/- |
| 18 कॅरेट रोज गोल्ड | = 1, 21, 415/- |
| 16 कॅरेट मुरणी | = 1, 07, 930/- |

बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777









# संगमनेर 2.0 : आता शहर अपग्रेड होणार

## १ मार्च २०२६ पासून कडक अंमलबजावणी; नागरिकांना 'भागीदार' होण्याचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भावी पिढ्यांच्या उज्वल भविष्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने 'संगमनेर २.० - **It's Time To Upgrade!'** ही व्यापक मोहीम हाती घेतली असून दि. १ मार्च २०२६ पासून शहरात नव्या कडक परंतु शिस्तीच्या नियमांची अंमलबजावणी सुरू होणार आहे.

शहर स्वच्छ, सुरक्षित आणि शिस्तबद्ध ठेवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक संगमनेरकराची नैतिक जबाबदारी आहे, असा ठाम संदेश देत नागरिकांना 'भागीदार' म्हणून सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नगराध्यक्षा डॉ. मैथिली सत्यजीत तांबे, उपनगराध्यक्ष नुरमोहम्मद पिरमोहम्मद शेख आणि मुख्याधिकारी दयानंद दादासाहेब गोरे यांनी संयुक्त निवेदनाद्वारे नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले आहे.

**रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त** - शहरातील रस्ते व फूटपाथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. दुकानदारांनी दुकानासमोरील वाढीव ओटे, शेड, अनधिकृत फलक त्वरित काढून टाकावेत.

**दुकानाबाहेर माल ठेवण्यास मनाई** - वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्यास नगरपालिका स्वतः तोडकाम करून खर्च संबंधित मालकाकडून वसूल करेल.

**जाहिरातबाजीला शिस्त**- पूर्वपरवानगीशिवाय बॅनर, पोस्टर्स, फ्लेक्स, झेंडे, कमानी लावण्यास सक्त मनाई. नियमबाह्य जाहिरातींवर तात्काळ कारवाई.परवानगीप्राप्त ठिकाणीच जाहिरात फलक लावण्याची मुभा.

**कचरा व्यवस्थापन सक्तीचे**- शहर स्वच्छतेसाठी 'ओला' व 'सुका' कचरा वेगळा करणे अनिवार्य करण्यात आले आहे. प्लास्टिक, कागद, बाटल्या सुक्या कचऱ्यातच द्याव्यात. मिश्र कचरा स्वीकारला जाणार नाही. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास भरारी पथकाकडून जागेवर दंड.

**मोकळे भूखंड स्वच्छ ठेवणे बंधनकारक**- खाजगी प्लॉट मालकांनी जागा स्वच्छ ठेवून कुंपण घालणे आवश्यक. कचरा, ज्वलनशील वस्तू किंवा डासांची उत्पत्ती होईल असे साठे ठेवण्यास बंदी. सूचना देऊनही स्वच्छता न केल्यास नगरपालिका स्वच्छता करून खर्च व दंड 'मालमत्ता करात' समाविष्ट करेल.

**पार्किंग आणि वाहतूक शिस्त** - हॉस्पिटल, बँका व मोठ्या आस्थापनांनी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करणे बंधनकारक. सर्व वाहने नियुक्त पार्किंग झोनमध्येच उभी करावीत. चौकात किंवा रस्त्यावर अव्यवस्थित पार्किंग केल्यास कायदेशीर कारवाई.

**बांधकामासाठी पूर्वपरवानगी आवश्यक**- कोणतेही बांधकाम नगरपालिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. मंजूर नकाशानुसारच बांधकाम करणे आवश्यक. विनापरवाना बांधकामांवर कठोर कारवाई.

**सार्वजनिक कार्यक्रमांवर नियंत्रण** -मिरवणुका, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी पूर्वपरवानगी बंधनकारक. अपवादात्मक परिस्थितीतच परवानगी. नियमांचे उल्लंघन केल्यास कार्यक्रमांवर बंदी.

**पथविक्रेत्यांसाठी नवे नियम**- रस्त्यावर व्यवसाय करण्यासाठी अधिकृत परवाना आवश्यक. विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई. दंड न भरल्यास थेट 'मालमत्ता करात' समावेश नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल. आकारलेला दंड न भरल्यास तो संबंधितांच्या मालमत्ता करात समाविष्ट केला जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.







**प्रशासनाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, काही नियम तात्काळ कठीण वाटू शकतात; मात्र ते शहराच्या उज्वल भविष्यासाठी आवश्यक आहेत. संगमनेर सुंदर, स्वच्छ आणि आदर्श बनविण्याची ताकद आपल्या प्रत्येकाच्या सहभागात आहे. चला, नियम पाळूया आणि संगमनेरला महाराष्ट्रातील आदर्श शहर बनवूया, असे आवाहन नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी केले आहे.**

**१ मार्च २०२६ पासून अंमलबजावणी होणाऱ्या या मोहिमेकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, 'संगमनेर २.०' ही मोहीम शहराच्या विकासातील नवे पर्व ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

# निमगावजाळी शिवारात दोन कारची समोरासमोर धडक

तीन जण जखमी



युवावार्ता (प्रतिनिधी): संगमनेर - तालुक्यातील निमगावजाळी शिवारात शुक्रवारी (दि. २७) दुपारी सुमारे ३:३० वाजेच्या सुमारास दोन चारचाकी वाहनांमध्ये झालेल्या भीषण अपघातात तिघेजण जखमी झाले आहेत. ही घटना हॉटेल न्यू तरंगजवळ घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, लोणीकडून संगमनेरच्या दिशेने येणारी इनोव्हा क्रिस्टा (एम.एच. १७ डीसी ६५६५) आणि संगमनेरकडून लोणीच्या दिशेने जात असलेली स्विफ्ट (एम.एच. १७ सीएक्स ५९२७) यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. मात्र, दोन्ही गाड्यांतील एअरबॅग्स वेळेवर उघडल्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. या अपघातात लोणी येथील हॉटेल व्यावसायिक गणपत भोसले यांच्यासह संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग येथील श्री. रहाटळ आणि त्यांच्या सोबत असलेले आणखी एक व्यक्ती असे एकूण तिघेजण जखमी झाले आहेत. भोसले यांच्या हात व पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तातडीने लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर उर्वरित दोघा जखमींना पुढील उपचारासाठी संगमनेर येथील रुग्णालयात हलविण्यात आले असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.

अपघाताचा मोठा आवाज ऐकताच परिसरातील ग्रामस्थांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व जखमींना वाहनातून बाहेर काढून प्राथमिक मदत केली. त्यांच्या समयसूचकतेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळू शकले. दरम्यान, माहिती मिळताच पोलिसांनीही घटनास्थळी दाखल होत मदतकार्याला सहकार्य केले.

# लाल बावट्याच्या राजूर लाँग मार्चची यशस्वी सांगता

## कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसह आदिवासींच्या प्रश्नांवर शासनाचा सकारात्मक निर्णय



### शासनाकडून महत्वाचे निर्णय

**मुंबई मंत्रालयात २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीनंतर पुढील महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले यात अर्धवेळ परिचरांना २,००० वेतनवाढ, शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना १,००० वेतनवाढ, भंडारदरा धरणाचे पाणी आदिवासी शेतकऱ्यांना पिण्यासाठी व सिंचनासाठी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वेक्षणाचे आदेश, वनजमिनी व घरांच्या तळजमिनी श्रमिकांच्या नावे करण्याच्या राज्यस्तरीय निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी, बांधकाम कामगारांसाठी शस्त्रक्रियेसह सर्व आजारांवर कुटुंब मेडिक्लेम योजना मंजूर, या निर्णयांसाठी आवश्यक आर्थिक तरतूद मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात आली व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेनंतर वेतनवाढीची घोषणा करण्यात आली.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- किसान सभा व सीटू कामगार संघटनेच्या वतीने दिनांक २४ फेब्रुवारी रोजी अकोले तालुक्यातील राजूर येथून निघालेल्या लाल बावट्याच्या लाँग मार्चची संगमनेर तालुक्यातील लोणी गावाच्या सीमेवरील निझर्णेश्वर मंदिर परिसरात दुपारी (२७ फेब्रुवारी) यशस्वी सांगता करण्यात आली.

तीन दिवसांत तब्बल ५८ किलोमीटरचा पायी प्रवास करत हा मोर्चा नगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या गावाच्या वेशीवर धडकला होता. या मोर्चामध्ये आदिवासी शेतकरी, महिला कामगार, अर्धवेळ कर्मचारी व विविध संघटना मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

२६ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे, आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके व विविध खात्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. काही मुद्द्यांवर पुढील कार्यवाहीसाठी सकारात्मक भूमिका घेण्यात आली.

यानंतर मंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मोर्चेकऱ्यांशी संवाद साधत एकूण १८ निर्णयांची माहिती दिली.

या लाँग मार्चदरम्यान वृद्ध, अपंग, निराधार मानधनवाढ, आशा व अंगणवाडी सेविका, अर्धवेळ परिचर, शालेय पोषण आहार कर्मचारी, बांधकाम कामगार व आदिवासी शेतकरी यांचे प्रश्न ठामपणे मांडण्यात आले. (पान ५ वर)






# विरोधकांकडून दिशाभूल करण्याचा प्रयत्न

## गुंजाळवाडीचे सरपंच अमोल गुंजाळ यांचे प्रत्युत्तर



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असलेल्या गुंजाळवाडी ग्रामपंचायतमध्ये आपण अत्यंत प्रामाणिकपणे काम करत आहोत. सतत होणारी विकासकामे आणि जनतेचा पाठिंबा हे विरोधकांना पाहावत नसल्याने त्यांनी सातत्याने अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. उच्च न्यायालयाने असे कोणतेही आदेश दिले नसल्याने विरोधक फक्त राजकीय हेतू ठेवून पत्रकबाजी करून जनतेची दिशाभूल करत असल्याची टीका सरपंच नरेंद्र उर्फ अमोल गुंजाळ यांनी केली आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, की २०२३-२४ मध्ये ग्रामपंचायत निवडणुकीत मुजाळवाडीमधील मतदारांनी मोठ्या मताधिक्याने मला निवडून दिले. जनतेच्या विश्वासाच्या पाठबळावर आपण सातत्याने विकास कामे राबवली आणि ही विकासकामे विरोधकांना सहन झाली नाही म्हणून त्यांनी मला थांबवण्यासाठी विविध षडयंत्र बनवले. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी माझ्या विरोधातील तक्रार फेटाळली. यानंतर उच्च न्यायालयाने सुद्धा या प्रकरणात काहीही मत दिले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध दाखल्यांचा संदर्भदेत त्यांनी आदेशाचे पालन करण्याचे निर्देश दिले. यानुसार माझे काम सातत्याने सुरू आहे.

(पान ४ वर)




संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# श्री श्री रविशंकर विद्यामंदिरात शाश्वत विकासावर विज्ञान मेळावा

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**




सुमेरू एज्युकेशन सोसायटी संचलित श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे 'शाश्वत विकास' या संकल्पनेवर आधारित विज्ञान प्रदर्शन शास्त्रीय व अभ्यासपूर्ण पद्धतीने आयोजित करण्यात आले. इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी एकूण ७० संशोधनाधारित प्रकल्प सादर करत वैज्ञानिक पद्धतीचा प्रभावी वापर केला. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी समस्येची ओळख, गृहितक मांडणी (हायपोथिसिस), माहिती संकलन, प्रयोग व निरीक्षण, निष्कर्ष आणि उपाययोजना या वैज्ञानिक प्रक्रियेचे टप्पे अनुसरून प्रकल्प सादर केले.

पर्यावरणीय समतोल, पाणी संसाधन व्यवस्थापन, अक्षय ऊर्जा स्त्रोत, सौरऊर्जेचा कार्यक्षम वापर, कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर, कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे उपाय, प्लास्टिक प्रदूषण नियंत्रण अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी मॉडेल्स, चार्ट्स, सांख्यिकीय माहिती आणि प्रत्यक्ष कार्यरत नमुने सादर केले. काही प्रकल्पांमध्ये सौर ऊर्जेवर चालणारी उपकरणे, पावसाचे पाणी साठवण प्रणाली, जैविक खत निर्मिती प्रक्रिया, तसेच घरगुती कचऱ्याचे वैज्ञानिक वर्गीकरण दाखविण्यात आले. विद्यार्थ्यांनी ऊर्जेचे संवर्धन, संसाधनांचे योग्य नियोजन आणि पर्यावरणीय शाश्वतता याबाबत वैज्ञानिक कारणमीमांसा स्पष्ट केली.

प्रमुख पाहुण्या सुजाता संतोष फापळे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीचे कौतुक करत विज्ञानाधारित शिक्षणाची आवश्यकता अधोरेखित केली. विद्यार्थिनी अनुश्री किरण कासट व समृद्धी संतोष मंडलिक यांनी 'शाश्वत विकास' या विषयावर सादर केलेल्या भाषणात जागतिक तापमानवाढ, नैसर्गिक संसाधनांचा समतोल वापर आणि भावी पिढ्यांसाठी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व स्पष्ट केले.

प्रदर्शनाला भेट देणाऱ्या पालक व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या तर्कशुद्ध विचारशक्ती, विश्लेषणात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना वैज्ञानिक आधारासह उत्तरे देत आपली संकल्पना स्पष्ट केली. या उपक्रमासाठी विज्ञान विषय शिक्षक, प्रियंका कातोरे, रुपाली जाधव, अजय हांडे तसेच सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणशक्ती, प्रयोगशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होत असल्याचे स्पष्ट झाले.

शाळा शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच प्रत्यक्ष कृतीतून ज्ञान प्राप्त करणे या तत्त्वावर भर देत विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबत सामाजिक जबाबदारीची जाणीवही दृढ होत आहे.विज्ञान हे केवळ विषय नसून विचार करण्याची पद्धत आहे, हा संदेश देत विज्ञान प्रदर्शनाची यशस्वी सांगता करण्यात आली.

# कान्हेगाव रेल्वे ट्रॅक जवळ पादचारी भुयारी मार्गाला मंजुरी - खा. वाकचौरे

**लोणी (युवावार्ता प्रतिनिधी)–**



मौजे कान्हेगाव येथील हनुमानवाडी परिसरात पादचारी नागरिक, विद्यार्थी व स्थानिक रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या पादचारी भुयारी मार्गाच्या बांधकामास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत पुणे येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक अनिल कुमार पाठक यांनी खा. वाकचौरे यांना लेखी पत्राद्वारे उत्तर कळविले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून खा. वाकचौरे याबाबतीत दिल्ली दरबारी पाठपुरावा करत होते. त्यामुळे कान्हेगाव व कोपरगाव रेल्वे स्थानकांदरम्यान, रेल्वे किमी ४५०/४-५ या ठिकाणी हा पादचारी भुयारी मार्ग मंजूर करण्यात आला असून, रेल्वे रुळ ओलांडताना होणारे अपघात टाळण्यास मोठी मदत होणार आहे. विशेषतः शेजारीच असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांसाठी, वृद्ध नागरिक आणि शेतकरी यांना याचा मोठा फायदा होणार आहे. रेल्वे प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, सबवेसाठी आवश्यक असलेले जनरल अरेंजमेंट ड्रॉइंग सध्या मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. ही मंजुरी मिळताच प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यात येणार आहे.

दरम्यान, खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी पुणे विभागाचे रेल्वे अधिकारी, कोपरगाव तहसीलदार आणि रेल्वे मार्गालगतचे रहिवाशी यांची संयुक्त बैठक आपल्या अध्यक्षतेखाली कोपरगाव तहसील कार्यालयात लावली होती, त्याचीही दखल घेऊन प्रवासी व स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सार्वजनिक जागा खुल्या करून, उर्वरित दौंड-मनमाड रेल्वे विभागात कुंपण घालण्याचे कामही युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. या उपाययोजनांमुळे अनधिकृत रेल्वे मार्ग ओलांडण्याच्या दुर्घटना कमी होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

यामुळे कान्हेगाव-भोजडे ग्रामस्थांना अधिक फायदा होणार असून, भोजडे विकास सोसायटीचे चेअरमन तथा शिवसेनेचे जिल्हा समन्वयक मुकुंद सिनगर यांनी खा. वाकचौरे यांचे जाहीर आभार मानले आहेत. यावेळी सतत पाठपुरावा करणारे कान्हेगाव-वारी येथील शिवसेनेचे जेष्ठ नेते गोरख टेके, तान्हाजी थोरमिसे, तालुका संघटक अशोक कानडे, पत्रकार प्रशांत टेके, अशोक काजळे यांच्यासह स्थानिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# सह्याद्री विद्यालयाचे राष्ट्रीय स्कॉलरशीप परीक्षेत यश

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**




भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालय, संगमनेर यांनी एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेत सलग दुसऱ्यांदा दैदीप्यमान यश संपादन करत आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यालयातील एकूण ११० विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल ७७ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले आहे. १८० गुणांच्या या परीक्षेत विद्यालयातील १८ विद्यार्थ्यांनी १०० किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून विशेष यश संपादन केले असून, या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना शासकीय शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा प्रमुख वीरेश नवले व स्मिता भोर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या नियोजनबद्ध अध्यापन पद्धतीमुळे आणि सातत्यपूर्ण सरावामुळे हे यश शक्य झाले.

सह्याद्री विद्यालयामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यावर विशेष भर दिला जातो. विज्ञान-तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, क्रीडा तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम विद्यार्थी घडविण्यात एनएमएमएस परीक्षेचा मोठा वाटा आहे. विद्यालयात इयत्ता ५ वी व ८ वी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा, ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षा, डॉ. सी. व्ही. रमण वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा, शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा, तसेच तालुका, जिल्हा व विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये नियमित सहभाग, असे विविध गुणवत्ता-वर्धक उपक्रम राबवले जात आहेत.

या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. व चेअरमन डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सेक्रेटरी माजी प्रधान न्यायाधीश सुमंत कोल्हे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, संगमनेर नगरपालिकेच्या विद्यमान नगराध्यक्षा मैथिली तांबे, एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा जयश्री थोरात, संचालक बाबा खरात, खजिनदार ज्ञानेश्वर सांगळे, प्रशासन अधिकारी चेतन मुर्तडक, विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य एस. एम. खेमनर, उपमुख्याध्यापिका सुरेखा दिघे, पर्यवेक्षिका संगिता रणशुर, पर्यवेक्षक किशोर देशमुख, आण्णासाहेब दिघे तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या उल्लेखनीय यशामुळे भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालयाने संगमनेर तालुक्यात शैक्षणिक गुणवत्तेचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे.

# डॉ. कैलास दौंड यांनी शोधलेले आजच्या शिक्षण प्रक्रियेतील प्रेरक व्यक्तिमत्त्व - 'आजचे शिक्षणयात्री'




सध्या शिक्षण प्रक्रिया संक्रमण अवस्थेतून जात आहे. अनेक शाळाबाह्य कामाने शिक्षकाचे कंबरडे मोडले आहे. शासनाचा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांकडे बघण्याचा दृष्टिकोन उदासीन वाटत आहे. अशा या वातावरणात महाराष्ट्रातील अनेक वाडी-वस्तीवरील शिक्षक नाविन्यपूर्ण, कल्पक उपक्रमांतून समर्पित वृत्तीने शिक्षण क्षेत्रात जोमाने काम करत आहेत. कोणत्याही राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग गुणवत्तापूर्ण शिक्षणातूनच जातो, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण व वैविध्यपूर्ण शैक्षणिक काम करणाऱ्या ५१ शिक्षकांच्या प्रेरणादायी कार्याचा लेखाजोखा आपल्या शब्दांत अत्यंत प्रभावीपणे कवी आणि लेखक डॉ. कैलास दौंड यांनी 'शिक्षणयात्री' या पुस्तकातून मांडला आहे. 'सकाळ ग्रोवन' या साप्ताहिकात त्यांनी वर्षभर लेखमाला लिहिली. त्याचेच पुस्तकरूपाने हे संकलन झाले. चपराक प्रकाशनाचे घनश्याम पाटील यांनी अतिशय सुंदर रूपात त्याला सादर केले आहे. सध्याच्या शिक्षण प्रक्रियेवर अनेक पुस्तके लिहिणारे शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांची सविस्तर प्रस्तावना पुस्तकाला लाभली आहे. शिक्षण क्षेत्रात प्रशासकीय अधिकारी म्हणून ज्यांनी अनेक शिक्षकांना प्रेरित केलं, असे दिनकर टेमकर साहेब यांनी पुस्तकावर भाष्य केलं आहे.

डॉ. कैलास दौंड लिखित 'आजचे शिक्षणयात्री' हे पुस्तक महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात नवीन काहीतरी करू पाहणाऱ्या शिक्षकांसाठी दिशादर्शक आहे. या पुस्तकात लेखकाने अशा ५१ ध्येयवेड्या शिक्षकांच्या कार्याचा पट मांडला आहे, ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या कल्पकतेने जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा कायापालट केला आहे.

लेखक या शिक्षकांना 'शिक्षणयात्री' किंवा 'ज्ञानाचे वारकरी' म्हणून संबोधतात. ज्याप्रमाणे वारकरी विठ्ठलाच्या भेटीसाठी निस्सीम श्रद्धेने पंढरीची वारी करतो, त्याचप्रमाणे हे शिक्षक कोणत्याही भौतिक सुखाची किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता, केवळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला वाहून घेत आहेत. सध्याच्या काळात शिक्षणाचे बाजारीकरण आणि खासगीकरण वेगाने होत असताना, हे पुस्तक सरकारी शाळांमधील गुणवत्तेचा आणि तिथे चालणाऱ्या नाविन्यपूर्ण प्रयोगांचा आरसा बनले आहे.

पुस्तकातील प्रत्येक शिक्षकाचे कार्य एका नव्या संघर्षाची आणि यशाची कथा सांगते. गडचिरोलीच्या दुर्गम भागात मांतैय्या बेडके यांनी लोकसहभागातून उभी केलेली शाळा असो, किंवा शिवाजी अंबुलगेकर यांनी भटक्या-विमुक्त मुलांच्या बोलीभाषेला प्रमाणभाषेशी जोडण्यासाठी केलेले भाषिक प्रयोग असोत, हे सर्व उपक्रम शिक्षकी पेशाच्या पलीकडे जाऊन केलेल्या सामाजिक बांधीलकीची साक्ष देतात. माधव गव्हाणे यांच्यासारखे शिक्षक जेव्हा मुलांना सहजपणे 'लिहायला' प्रवृत्त करतात, किंवा नीलम सुंबे जेव्हा तंत्रज्ञानाचा वापर करून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचा संवाद थेट साहित्यिकांशी घडवून आणतात, तेव्हा सरकारी शाळांमधील शिक्षणाची झेप किती मोठी आहे, याची जाणीव होते. केशव गावित सारखा ध्येयवेडा शिक्षक हिवाळी शाळेमध्ये सर्व पाड्याची जबाबदारी घेऊन गुणवत्तेचा नवीन आयाम उभा करतो. त्यांचे हे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी न ठरले, तरच नवल. एकनाथ आव्हाडांसारखे साहित्यिक शिक्षक आपल्या साहित्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करतात. त्यावेळेस शिक्षकांचे बहुश्रुत असणे किती आवश्यक आहे, हे लक्षात येते. दिपाली सावंत, जयश्री पालांडे, भाग्यश्री शिंदे, सुजाता पुरी, कुंदा बच्छाव व श्वेता लांडे अशा अनेक शिक्षिकांचे कार्य बघितल्यानंतर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा वसा योग्य रित्या पुढे जात असल्याचा आभास होतो.

डॉ. कैलास दौंड यांची भाषा ओघवती आणि संवेदनशील आहे. त्यांनी हे लेखन केवळ माहिती म्हणून न करता, त्यातील मानवी पैलू अत्यंत प्रभावीपणे टिपले आहेत. लेखनात अवास्तव अलंकारिक भाषेचा वापर न करता, साध्या सोप्या भाषेत लिखाणाची मांडणी केली आहे. मूळची 'सकाळ ग्रोवन' मधील ही लेखमाला पुस्तकरूपाने संग्रही राहण्यासारखी झाली आहे. हे पुस्तक केवळ शिक्षकांसाठीच नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकासाठी प्रेरणादायी आहे. 'आजचे शिक्षणयात्री' वाचताना जाणवते की, जर शिक्षकाची दृष्टी सकारात्मक आणि कृतीशील असेल, तर कोणतीही भिंत किंवा अभाव ज्ञानाचा प्रकाश पोहोचवण्यापासून रोखू शकत नाही. महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्राचा पसारा खूप मोठा आहे. सरांनी प्रतिनिधिक स्वरूपात शिक्षण यात्रींची निवड केली आहे. अजूनही अनेकांचे कार्य अदृश्य स्वरूपात आहे, हे सर प्रांजळपणे कबूल करतात. थोडक्यात, हे पुस्तक महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील बदलत्या शैक्षणिक प्रगतीसाठी दिपस्तंभ ठरावा, ही अपेक्षा.

**– अशोक शेटे, संगमनेर**
**मो.न. ९९२११६९२८६**

# राजापूर येथे मराठी गौरव दिन उत्साहात

**राजापूर (युवावार्ता प्रतिनिधी)–**



नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजापूर येथे मराठी गौरव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब वर्पे उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. अमोल खरात यांची उपस्थिती लाभली. त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व, तिची समृद्ध साहित्यपरंपरा आणि जागतिक स्तरावर वाढत असलेली ओळख याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून, ती आपली संस्कृती, इतिहास आणि सामाजिक जाणीवा जपणारी सशक्त अभिव्यक्ती आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून दैनंदिन व्यवहारात तिचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रा. गोफणे यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले. महाविद्यालयात विविध भाषिक आणि साहित्यिक उपक्रम राबविले जात असून, विद्यार्थ्यांचा त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी कविता वाचन, भाषणे तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे मराठी भाषेबद्दलचा अभिमान व्यक्त केला. संपूर्ण कार्यक्रम उत्साह, अभिमान आणि सांस्कृतिक रंगत यांनी परिपूर्ण झाला. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. जयश्री चव्हाण आणि प्रा. सचिन वाकचौरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संगिता भवर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रविण आहेर यांनी केले.

# शून्य खर्चात ग्राम महसूल अधिकाऱ्याचे आधुनिक वेब पोर्टल

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**



प्रशासकीय सेवा अधिक गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी आता आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत आहेत. नागरिकांचा अमूल्य वेळ वाचावा आणि त्यांना उत्तम सुविधा मिळाव्यात, या उदात्त हेतूने अत्यंत प्रगत आणि नाविन्यपूर्ण असे 'वेब पोर्टल' विकसित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, कोणत्याही बाह्य कंपनीची मदत न घेता राहिमपूर आणि उंबरी बाळापूर साजाचे ग्राम महसूल अधिकारी श्री. विक्रम ओतारी यांनी स्वतः पुढाकार घेऊन talathijanaseva.in हे ऑनलाइन पोर्टल जवळपास शून्य खर्चात उभे केले आहे.

या वेब पोर्टलची वैशिष्ट्य - एका क्लिकवर तलाठी उत्पन्न दाखला, फेरफार नोंदीची वर्दी देणे, विविध योजनांची माहिती, तलाठी यांचे आवक जावक रजिस्टर लाईव्ह पाहता येणे इत्यादी सुविधा या पोर्टल मध्ये असून, नागरिकांच्या वेळेची आणि पैशांची बचत या आधुनिक वेब पोर्टलच्या माध्यमातून होणार आहे. विविध शासकीय योजनांची अचूक माहिती आणि आवश्यक दाखल्यांसाठीचे अर्ज एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ऑनलाईन प्रणालीमुळे नागरिकांना अत्यंत सुलभतेने तलाठी कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या सेवा मिळतील. गतिमान आणि पारदर्शक कामकाजासाठी थेट ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची सुविधा तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे या पोर्टल वर तलाठी आवक जावक रजिस्टर लाईव्ह पहायला उपलब्ध असणार आहे, त्यामुळे प्रशासकीय कामकाजात १००% पारदर्शकता आणि प्रचंड गतीमानता निर्माण होणार आहे. ग्राम महसूल अधिकारी यांची डिजिटल स्वाक्षरी असणारा उत्पन्न दाखला ऑनलाइन देण्याची सुविधा तसेच तलाठी कार्यालयाचे आवक जावक रजिस्टर जनतेला लाईव्ह पाहता येण्याची सुविधा देणारा हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग आहे. या सोयी आणि सुलभतेमुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

महसूल विभागाचा सकारात्मक दृष्टिकोन : नागरिकांना अधिकाधिक दर्जेदार सुविधा देण्यासाठी महसूल विभागातील अधिकारी स्वतः नवनवीन डिजिटल तंत्रज्ञान शिकत आहेत. जनसेवेसाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी एक अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी आदर्श प्रस्थापित केला आहे. महाराष्ट्र शासन आणि विशेषतः महसूल विभाग स्वतःचा चेहरा मोहरा बदलत असून, महसूल विभाग वेगाने आधुनिकतेकडे झेप घेत आहे, त्यामुळे नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम करायला महसूल विभागात वाव भेटत असतो, अशी प्रतिक्रिया विक्रम ओतारी यांनी दिली आहे, अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे शहराध्यक्ष कैलास कासार यांनी दिले.


# संपादकीय...

## पर्यावरण पूरक होळी साजरी करावी

देशात होळी हा सण प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पध्दतीने सर्वत्र साजरा करण्यात येतो. यामुळे आपल्याला सर्वत्र होळी मिलन दिसून येते. महाराष्ट्रात मराठी माणसांसाठी होळीचे आगळीवेगळे महत्त्व आहे. होळी म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा सण. ज्याप्रमाणे इंग्रजी वर्षानुसार डिसेंबर हा शेवटचा महिना असतो, त्याचप्रमाणे होळीचा फाल्गुन महिना मराठी माणसासाठी शेवटचा महिना आहे. नवीन वर्षांची सुरुवात चैत्र महिन्यापासुन होते, म्हणजेच गुडी पाडवा. त्यामुळे जुने वर्ष होळी व धुलीवंदनाच्या रूपात साजरे करून जुन्या वर्षाला निरोप दिला जातो आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते. बदलत्या काळानुसार होळी व धुलीवंदन साजरे करतांना पर्यावरण व निसर्गाचे संतुलन जोपासने अत्यंत गरजेचे आहे. त्याच अनुषंगाने कोणत्याही धर्माचे सण असो, त्यांनी सुध्दा निसर्गाला कुठेही इजा पोहोचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत वाढते प्रदूषण व भीषण पाणी टंचाई सर्वांसाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. त्यामुळे होळी हा सण साजरा करतांना पर्यावरणाशी निगडित असावा, जेणेकरून निसर्गाला इजा पोहोचणार नाही. कारण होळी या सणाला लाकुड, पाणी यांचा वापर जास्त होतो आणि या दोन्ही गोष्टी पर्यावरणाशी अत्यंत निगडित आहेत. होळीला दरवर्षी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. त्यामुळे होळी या सणाला पाण्याचा वापर कमी करावा व पर्यावरणातील वाढते प्रदूषण पहाता स्वच्छतेकडे सर्वांनीच जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करावे. देशात आणि जगात पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे आणि वाढणार सुध्दा आहे. त्यामुळे होळीच्या सणाला पाण्याचा वापर टाळावा व पाणी वाचविण्याचा संकल्प सर्वांनीच करावा. उष्णतेचे वादळ आणि पाण्याचा हा! हा! कार यामुळे मानव व पशुपक्षी नेहमीच भरडत असतो आणि भरडत आहे. वाढती लोकसंख्या, यामुळे मानवाने भुभावर पुर्णतः अतिक्रमण केल्याचे दिसून येते. देशात होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातो. होळीच्या दीवशी गुलाल, रंग, वारीस इत्यादीसह केमिकल युक्त रंगाचा वापर होतांना आपण पहात असतो. यामुळे डोळ्यांना व चेहऱ्याला इजा होऊ शकते, यापासून सावध राहण्याची गरज आहे. रंग खेळताना कोणीही हा विचार करत नाही की पाण्याचा व्यत्यय कीती होतो. होळी या सणाला दरवर्षी लाखो लिटर पाणी वाया जात असते आणि पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वांनाच वणवण भटकावे लागते. आजही देशासह महाराष्ट्रात पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दीसते व याचा परिणाम शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भोगावा लागतो. आजच्या परीस्थितीत हवामान खाते सांगत आहे की यावर्षी उन्हाळा नेहमीपेक्षा जास्त तापणार आहे. यावरून आपण समजू शकतो की पाण्याची समस्या कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे आज पाण्याचा एक एक थेंब वाचवीण्याकरीता मानवाने चुरशीचे प्रयत्न केले पाहिजे. होळीचा सण हा पाच दिवस, म्हणजेच पंचमी पर्यंत चालतो. त्यामुळे या काळात पाण्याचा वापर जास्तीत जास्त टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे देशात अवैधरित्या जंगल तोडीमुळे लाकडांची कमतरता पहाता होळी दहणाकरीता कमीत कमी लाकडांचा उपयोग केला पाहिजे किंवा होळी दहनाकरीता गोअरीचा (काउडंग) चा वापर जास्त करावा, यामुळे पर्यावरणात सुगंध निर्माण होईल. देशात आणि जगात पाण्याची समस्या पहाता फक्त देशी गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळी या महत्त्वपूर्ण सनाचा आनंद घ्यावा. आज पाण्याच्या भरोशावरच मनुष्य, पशुपक्षी, अन्न-धान्य, संपूर्ण जीवसृष्टी, जंगल हे सर्व पाण्यावरच अवलंबून असते. पाणी हे सोन समजा आणि होळीला फक्त गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळीचा सण साजरा करावा. ज्या प्रमाणे मानवाला अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टीची गरज आहे, त्याचप्रमाणे आज संपूर्ण जिवसृष्टीला व पृथ्वीला पाण्याची नितांत गरज आहे. जंगल तोडीमुळे निसर्गाचे संतुलन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या, अस्वल) इत्यादी अनेक प्राणी जंगलातून गावात व शहरात शिरकाव करतांना दिसते. कारण मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जंगल संपदेवर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. त्यामुळे जंगलातील प्राणी शहरात येत नसुन आपण जंगलाकडे आगेकूच (अतिक्रमण) करीत आहोत.

CorelDRAW
Ps
Ai
Id

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER



Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

पान नं. ०१ वरुन...

## विरोधकांकडून दिशाभूल...

सदर याचिका उच्च न्यायालयात घेण्याबाबत माझे वकील यांनीही संमती दिली होती. विरोधकांनी ज्या सिटी सर्वे क्रमांक १६०, १६१ आणि १६२ या बाबत आ क्षेप नोंदवला आहे ती जागा आमच्या कुटुंबियांची आहे आणि आजही ती जागा मोकळी आहे. जीपीएसद्वारे सुद्धा त्याची मोजणी केली असता ती जागा मोकळी आहे तेथे कोणतेही बांधकाम नाही.

कधीही नोकरीत असताना निवडणूक लढवणे यासाठी परवानगी घेणे बंधनकारक नसतानाही आपण संस्थेची परवानगी घेतली आहे. विविध धार्मिक आणि सामाजिक कामांमधून सातत्याने जनतेची सेवा आपण केली आहे. निवडणुकीनंतर पक्षपात केला नाही. मात्र विरोधकांना आपला वाढत चाललेला जनाधार पहावत नसल्याने ते निराधार आरोप करून जनतेची दिशाभूल करत आहे. सरपंच पदाबाबत अप्पर आयुक्त नाशिक व उच्च न्यायालय औरंगाबाद यांचे कोणतेही आदेश नाही. त्यामुळे अशा निराधार व तथ्यहीन आरोपांवर कोणीही विश्वास ठेवू नका असे आवाहन त्यांनी केले आहे. त्यांच्यावतीने ॲड. सोनकवडे यांनी काम पाहिले. तर विभागीय अपर आयुक्त नाशिक यांच्याकडे ॲड. प्रशांत गुंजाळ यांनी काम पाहिले.

### पाहिजेत
मेडीकल होलसेलसाठी
सेल्समन - १ (फोर व्हीलर ड्रायव्हींग आवश्यक)
सेल्समन -१ (अनुभवी)
मेडीकल रीफ्रेझेटेटीव्ह -१
Opsang Pharma
मालदाड रोड, (वेदांत कॉम्पलेक्स)संगमनेर
9890872873

### पाहिजेत
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर
रिसेप्शनीस्ट - 1 महिला
पार्ट टाईम - 4 ते 7: 30
8080548282

### पाहिजेत
होलसेल दुकानासाठी मुले/ मुली पाहिजेत
अनुभवास प्राधान्य
हेल्पर - २
सेल्समन - २
7020585298
9422905155

### बौद्ध वधू पाहिजे
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मीक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

रजि.नं.-ANR/SNR/RSR(CR) 826 / 93-94 दि.०३/०४/१९९३

### राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

नवीन नगर रोड, ओंकारनाथ मालपाणी मार्ग, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज चौक, विद्यानगर, संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ.नगर फोन नं. (०२४२५) २२३२२१

### सोने तारण थकबाकीदारांना जाहिर लिलाव नोटिस

खाली नमुद केलेल्या सोने तारण कर्जदारांनी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाची व व्याजाची वेळेवर परतफेड न केल्याने कर्ज रक्कम थकबाकी झालेली आहे. कर्जाच्या वसुलीकरिता संबंधीत कर्जदारांना वारंवार लेखी नोटिस देवून त्यास प्रतिसाद न दिल्याने संस्थेने दागिन्यांचा लिलाव करण्याचे निश्चित केलेले आहे. तरी सर्व सोने तारण थकबाकीदारांना कळविण्यात येते की, आपण आपले दागिने दिनांक ०७/०३/२०२६ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत व्याजासह मुद्दल भरुन सोडवून घ्यावेत. अन्यथा आपल्या दागिन्यांचा जाहीर लिलाव दिनांक ०९/०३/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात संस्थेच्या अटी व शर्ती यांना अधिन राहुन करण्यात येईल. लिलावाद्वारे प्राप्त झालेली रक्कम संबंधीत कर्ज खात्यात जमा केली जाईल. परंतु सोने विक्री करुनही कर्ज रक्कम, व्याज व इतर - खर्च वसूल न झाल्यास बाकी येणे रक्कमेसाठी कर्जदारांच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मधील कलम १०१ अथवा ९१ अन्यये दावा दाखल केला जाईल व उर्वरीत कर्जाची वसूली केली जाईल, याची नोंद घ्यावी. त्यासाठी होणारे खर्चास व परिणामांस कर्जदार जबाबदार राहतील. तरी इच्छुकांनी वरील पत्त्यावर उपस्थित रहावे.

| अ.क्र. | खाते क्रमांक | कर्जदाराचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | १०६४७ | श्री. शिंदे संजय वामन | संजय गांधी नगर, संगमनेर, जि. अहिल्यानगर |

**लिलावात भाग घेणाऱ्यांना सूचना-**

१. इच्छुक खरेदीदारांनी (के.वाय.सी नियमाप्रमाणे) स्वतःचे ओळखपत्र व निवासाचा पुरावा घेवून येणे आवश्यक आहे.
२. सोने विक्रीसाठी लिलावधारकांचे बिड रक्कम अंतिम झाल्यास ४८ तासात पैशांचा भरणा संबधीत कर्ज खात्यावर करावा लागेल.
३. लिलावाच्या अटी व शर्ती बँकेत / पतसंस्थेत पहावयास मिळतील व त्या लिलावधारकांवर बंधनकारक राहतील.
४. लिलाव करण्याचे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार बँक/ अधिकृत अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत. त्या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.

दि. २८/०२/२०२६ (शिक्का)

सही/-
**व्यवस्थापक**
राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर ता. संगमनेर, जि. अ.नगर

### जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर या शाळेसाठी बस सेवा आवश्यक
जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलसाठी कंत्राटी पद्धतीने शालेय बस सेवा पुरविण्यास इच्छुक, अनुभवी व विश्वसनीय कंत्राटदारांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत
शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीचा अनुभव आवश्यक
सर्व आवश्यक कागदपत्रे अद्ययावत असणे बंधनकारक (RC, Insurance, Fitness, Permit, Driving License)
प्रशिक्षित व जबाबदार चालक उपलब्ध असणे आवश्यक
बसची स्थिती उत्तम व सुरक्षित असावी
इच्छुकांनी अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा
संपर्क : ९८२२३०४६३८, ७७०९०९६५४२

### मोबाईल हरवला आहे
दि.२०/०२/२०२६ ला निंबाळे ते मोमीनपुरा या भागातून मोबाईल (रेड मी)-९७३०९३९५५५ या प्रकारचा मोबाईल गहाळ झाला असून ज्या कोणाला तो सापडला असेल त्याने तो परत करावा, परत करणाऱ्याला योग्य बक्षीस दिले जाईल
संपर्क - फॅन्सी शुज, मोमीनपुरा
9145735330

### पाहिजेत
अकाऊंटट - २ जागा ( टॅली कोर्स )
ड्रायव्हर - ३ जागा
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
9370071717
9822791484

### पाहिजेत
नामांकित साऊथ इंडीयन कॅफेसाठी
कॅशियर
हेल्पर
साऊथ इंडीयन कुक
१ ते २ वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक
संगमनेर
9518722868

### पाहिजेत
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

### पाहिजेत
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,

| | | |
|---|---|---|
| RMO डॉक्टर्स - (MBBS,BAMS, BHMS) | | सकाळ -२, दुपार-२ सायंकाळ -२ |
| नर्स - (BSC GNM) | | सकाळ -२, दुपार-२ सायंकाळ -२ |
| सिस्टर इनचार्ज- | Bsc Nursing/MBA | |
| डाटा ऐंट्री ऑपरेटर | MJPJAY | जागा -२ |
| क्लेम डॉक्टर - MJPJAY / Mediclaim | | जागा - ०२ |
| रिसेप्शन - महिला/पुरुष | | जागा - ०२ |
| वॉर्ड मॅनेजर | | जागा - ०१ |

8888882225 9766855593

### GP Furniture
सेल्समन भरणे आहे
पुरुष - ०२
महिला - ०२
आकर्षक पगार
भेटण्याची वेळ - ४ ते ७
अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजसमोर, घुलेवाडी, संगमनेर
9503500090
9860100414

### पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

### ड्रायव्हर पाहिजे
घरगुती ऑटोमॅटिक गाडीवर निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

### पाहिजेत
श्री ॲग्रो ऑरगॅनिक
पर्सनल ड्रायव्हर
ट्रान्सपोर्ट ड्रायव्हर
गोडाऊन सहाय्यक
पत्ता- दिल्ली नाका, भारत पेट्रोलियम समोर, संगमनेर
7588093327

### अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२
सेल्यमन - ०२
ड्रायव्हर - ०२
दुकान काम व शोरुमसाठी - ०२ जागा
महिला कामगार - ०२
9822097904

### ड्रायव्हर पाहिजे
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

### धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

### जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी
सिध्दार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ — एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ — कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ — अनुभव असल्यास प्राधान्य
घरकाम करणारी महिला- १ — सर्व घरकाम
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

### पाहिजेत सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन - २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता- प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

### पाहिजेत
मॅनेजर - १ (पुरुष)
पेट्रोलपंप चालविण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
राजश्री पेट्रोलियम, संगमनेर खुर्द-समनापूर, शिर्डी बायपास रोड,रायते, ता. संगमनेर
9850203275
9657203042

### पाहिजेत
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

### पाहिजेत
जागा भरणे आहे
अकाउंटट
सेल्समन
करवा एजन्सीज मेडीकल होलसेल, बस स्टॅण्ड मागे, संगमनेर
8308201045

### पाहिजेत
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

### सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

### जी.पी. माहेर फर्निचर
सेल्समन भरणे आहे
पुरुष - ०२
महिला - ०२
आकर्षक पगार
भेटण्याची वेळ - ४ ते ७
देवगाव रोड, संगमनेर खु. संगमनेर
7767097373

### पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

### विकणे आहे
संगमनेर शहराजवळील न्यु गोल्डनसिटी येथील टाकेश्वर मंदिराजवळ ०१ बी.एच.के फ्लॅट ( सर्व सुविधांयुक्त) विकणे आहे
7887552712

### पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

### नावात बदल
माझे लग्ना पूर्विचे नाव (इनामदार कौसर राजु ) INAMDAR KAUSER RAJU आहे तर माझे लग्नानंतरचे नाव: कौसर अश्पाक शेख (KAUSAR ASHPAK SHAIKH) आहे.




MALPANI

### अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
## मालपाणी उद्योग समूह आयोजित
## भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

**दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९ ७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४**

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# डॉ. प्रकाश वाकचौरे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व वृक्षारोपण उपक्रम उत्साहात



**अकोले**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
सामाजिक बांधिलकी जपत अकोले मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रकाश वाकचौरे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व वृक्षारोपण, असे दोन सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडले. आंतरभारती इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट, विरगाव संचलित मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी व आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, विरगाव यांच्या वतीने रोटरी क्लब सेंट्रल, अकोले मेडिकल फाउंडेशन व आधार ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ४७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले.

कार्यक्रमावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष अमोल देशमुख, माजी अध्यक्ष सचिन देशमुख, सचिन शेटे आदी मान्यवर उपस्थित होते. वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. प्रकाश वाकचौरे यांनी स्वतः रक्तदान करून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते. यावेळी संस्थेच्या संचालिका सुप्रिया वाकचौरे, गीता राहणे, प्रतीक्षा राहणे, प्राचार्य डॉ. पल्लवी फडके, प्रा. विद्याचंद्र सातपुते तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. प्राचार्य डॉ. पल्लवी फडके यांनी वर्षभरातील शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा घेत वार्षिक अहवाल सादर केला. दरम्यान, डॉ. प्रकाश वाकचौरे यांनी लहीत खुर्द येथील श्री संगमेश्वर देवस्थान परिसरात वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा केला. यावेळी सरपंच डॉ. लक्ष्मण गोडसे, माजी लोकनियुक्त सरपंच अर्जुन गावडे, डॉ. तुषार गावडे, डॉ. श्रद्धा गावडे, रामचंद्र गावडे, तात्याभाऊ गोडसे, पोपट गोडसे, अंजना वाकचौरे, सुमित गावडे तसेच अकोले मेडिकल फाउंडेशनच्या सचिव रूपाली वाकचौरे उपस्थित होत्या.

वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करताना, डॉ. वाकचौरे यांनी पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन केले. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रवरा नदी ते रायतेवाडी फाटा रस्त्यावर लखलखाट

## माजी मंत्री थोरातांच्या पाठपुराव्याला यश - उपसरपंच शिंदे



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**
माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर मध्ये येणाऱ्या चारही बाजूंच्या रस्त्यांचे चौपदरीकरण, सुशोभीकरण व विद्युतीकरणासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नामुळे प्रवरा नदी ते रायतेवाडी फाटा या संगमनेर खुर्द रस्त्यावर विद्युतीकरणाचा लखलखाट झाला असून, नागरिकांनी आनंद व्यक्त केला.

संगमनेर खुर्द येथे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून रस्त्यावर झालेल्या विद्युतीकरणाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी सरपंच श्वेता मंडलिक, माजी उपसरपंच गणेश साहेबराव शिंदे, उपसरपंच शैला भारती, ग्रामपंचायत सदस्य वैशाली सुपेकर, दत्तात्रेय खुळे, लिलाबाई टपले, गुलाब शेख, डॉ. विनायक गुंजाळ, पल्लवी गुंजाळ, काळू शिंदे, आशा शिंदे, स्वाती शिंदे, किसान सातपुते, शिवनेरी दूध संस्थेचे चेअरमन सुभाष गुंजाळ, महेश गुंजाळ, विश्वस्त कपालेश्वर देवस्थान खांडगाव प्रभाकर गुंजाळ, बिलाल शेख, रमेश गुंजाळ, रमेश सुपेकर, भगवान गोफणे तसेच परिसरातील नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर शहरात येणाऱ्या चारही देशांच्या रस्त्याचे चौपदरीकरण व सुशोभीकरण केले. या अंतर्गत इंजिनिअरिंग कॉलेजचे संगमनेर बस स्थानक हा हॅपी हायवे तयार केला असून, पश्चिमेकडील अकोले नाका ते नाशिक पुणे रोड व पूर्वेकडील दिल्ली नाका ते समनापुर आणि दक्षिणेकडील दिल्ली नाका ते रायते फाटा या रस्त्यांचे चौपदरीकरण व सुशोभीकरण करण्यात आले आहे.

प्रवरा नदी ते रायते फाटा या रस्त्याच्या विद्युतीकरणाकरता ७ फेब्रुवारी २०२३ रोजी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांना पत्र देऊन निधीची मागणी केली. यानंतर या कामासाठी १ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. याचबरोबर ६ मार्च २०२४ रोजी या कामाची निविदा प्रसिद्ध झाली. त्यामधून हे काम पूर्ण झाले असून, आता प्रवरा नदी ते रायते फाटा यादरम्यान संपूर्ण विद्युतीकरण झाले आहे. या कामी इंद्रजीत भाऊ थोरात व यशोधन कार्यालय यांनी सातत्याने पाठपुरावा केला. यामुळे संपूर्ण रस्त्यावर लखलखाट झाला आहे.

यावेळी बोलताना माजी उपसरपंच गणेश शिंदे म्हणाले की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तालुक्यातील प्रत्येक गावच्या विकासासाठी निधी दिला आहे. आपला तालुका, आपले शहर सुंदर व्हावे याकरता सातत्याने प्रयत्न केला आहे. हा सर्व निधी त्यांच्या कार्यकाळात मंजूर झाला असून, अनेक जण श्रेय घेण्याचा प्रयत्न करतील, परंतु हे श्रेय खऱ्या अर्थाने लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे आहे.

# राजूर येथे व्यसनमुक्ती शिबिर यशस्वी

**राजूर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
गौधाम व्यसनमुक्ती मार्गदर्शन केंद्र, राजुर ता. अकोले आणि महाएकता फाउंडेशन, तांदलवाडी ता. रावेर तर्फे आयोजित भव्य व्यसनमुक्ती संस्कार व मार्गदर्शन शिबीर राजुर येथे संपन्न झाले. यावेळी जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर, रावेर आणि अ. नगर, पुणे, कोपरगाव, नाशिक जिल्ह्यातील ३५ शिबिरार्थींनी सहभागी होऊन व्यसनापासून दूर जाण्याचा संकल्प घेतला. पुढील काळात सुद्धा निवासी व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकानी सांगितले. व्यसनांचे दुष्परिणाम कळत असूनही व्यसन सोडू शकत नाहीत, अशी त्यांची दयनीय परिस्थिती असते तसेच त्यांच्या परिवाराला सुद्धा नाइलाजाने यातना सहन कराव्या लागतात.

गौधाम व्यसनमुक्ती केंद्राचे अध्यक्ष गौराम बिडवे यांच्या मार्गदर्शनाने निर्माण केलेले अतिशय प्रभावी व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबीर आहे. जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील आठ यशस्वी निवासी व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबिरा नंतर हे शिबीर गौधाम व्यसनमुक्ती मार्गदर्शन केंद्र, राजुर येथे आयोजित केलेले होते. या शिबिरामध्ये कुठल्याही प्रकारच्या संपर्क साधनांचा (मोबाईल वगैरे) वापर करण्यास सक्त मनाई असते. शिबिरात निवास व सात्विक भोजनाची व्यवस्था समाविष्ट आहे. गरजेनुसार या निवासी शिबिरात कुटुंबियांसाठीचा विशेष समावेश, वेगळे प्रशिक्षण कार्यक्रमही घेतला जातो. असे आवाहन शिबिराचे आयोजक, गौधाम व्यसनमुक्ती मार्गदर्शन केंद्र, राजूर व महाएकता फाउंडेशन, तांदलवाडी यांचे वतीने करण्यात येत आहे.

## लाल बावट्याच्या...

पान १ वरुन

मान्य मागण्यांच्या अंमलबजावणीबाबत वारंवार खात्री करून घेत अखेर निझरणेश्वर मंदिर परिसरात लाँग मार्च स्थगित करण्याची घोषणा करण्यात आली. या आंदोलनात माकपच्या पॉलिट ब्युरो सदस्य मरियम ढवळे, आमदार विनोद निकोले, अशोक थोरात, किसान सभेचे राज्याध्यक्ष उमेश देशमुख यांच्यासह जितेंद्र चोपडे, उद्धव पौळ, रामेश्वर पौळ, दीपक लिपणे, धर्मा शिंदे, नवनाथ मोरे, तबरेज शेख आदी पदाधिकार्यांचा सहभाग होता. मोर्चाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, नंदू डहाणे, नामदेव भांगरे, एकनाथ मेंगाळ, गणेश ताजणे, संगीता साळवे, हेमलता शेळके, तुळशीराम कातोरे, सुमन विरनक, राजाराम गंभीरे, ताराचंद विघे, मथुराबाई बर्डे आदींनी विशेष मेहनत घेतली. तीन दिवसांचा संघर्ष, ५८ किलोमीटरचा प्रवास आणि शासनाकडून सकारात्मक निर्णय, लाल बावट्याच्या राजूर लाँग मार्चने अखेर यशाची पताका फडकावली.

# संगमनेर तालुका शिवसेना संघटकपदी योगेश गुंजाळ



**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
सामाजिक कार्यातून आपली वेगळी ओळख निर्माण करणारे युवा कार्यकर्ते योगेश गुंजाळ यांची संगमनेर तालुका शिवसेना संघटकपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

गेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान योगेश गुंजाळ यांनी पक्षासाठी केलेल्या कामाची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. निवडणूक काळात त्यांनी बूथस्तरावर संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे आणि मतदारांपर्यंत पक्षाची भूमिका प्रभावीपणे पोहोचविणे यासाठी विशेष परिश्रम घेतले होते. त्यांच्या या कामाची दखल घेत आ. अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना पुढील जबाबदारी देण्यात आली आहे.

योगेश गुंजाळ हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. ग्रामीण भागात विविध सामाजिक प्रश्नांवर पाठपुरावा आणि गरजू नागरिकांना मदत अशा विविध माध्यमांतून त्यांनी समाजाशी नाळ जपली आहे.

नवीन जबाबदारीबाबत बोलताना योगेश गुंजाळ यांनी सांगितले की, ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची असून पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला सोबत घेऊन शिवसेनेचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यांनी आमदार अमोल खताळ यांचे मार्गदर्शन लाभत असल्याचेही नमूद केले.

तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी गुंजाळ यांच्या निवडीचे स्वागत करत त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

या निवडीमुळे आगामी काळात संगमनेर तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शिक्षकांना वेठीस धरणाऱ्या संस्था चालकांवर कारवाई करा - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - संगमनेर तालुक्याच्या ग्रामिण भागातील जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था, खाजगी शिक्षण संस्थांकडून शिक्षकांवर होणारा अन्याय तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये फी वसुलीच्या नावाखाली पालक व विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या धमक्या आणि अमानुष वागणुकीबाबत आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

आ. खताळ म्हणाले की, ग्रामिण भागातील जिल्हा परिषद शाळांची अवस्था अत्यंत चिंताजनक असून जीर्ण इमारतींमुळे एखादी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा शाळांच्या दुरावस्थेकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी त्यांनी केली. मतदारसंघातील काही खाजगी शिक्षण संस्थांकडून शिक्षकांना निवडणूक प्रचारासाठी पाठविले जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. शिक्षकांना वेठीस धरणाऱ्या संस्थाचालकांवर तात्काळ व कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये फी न भरल्यास पालकांवर दंड आकारणे, विद्यार्थ्यांना वर्गात बसू न देणे किंवा शाळेच्या बसमधून खाली उतरवणे अशा प्रकारच्या धमक्या देऊन अमानुष व बेकायदेशीर वागणूक दिली जात असल्याचेही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हक्क आणि मानसिक आरोग्य अबाधित राहण्यासाठी शासनाने स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत, अशी मागणी करत शिक्षण हा अधिकार आहे, व्यवसाय नाही. राज्य सरकारने तात्काळ हस्तक्षेप करून विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत अशी ठाम भूमिका आमदार अमोल खताळ यांनी मांडली.




















पॅनल देणे आहे




पॅनल देणे आहे












# रविवारी चंदनापुरी-हिवरगाव पावसा परिसरात विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी, हिवरगाव पावसा व संगमनेर खुर्द परिसरात विविध विकासकामांचा भव्य भूमिपूजन व लोकार्पण सोहळा रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते हे कार्यक्रम पार पडणार आहेत.

यावेळी मार्गदर्शनासाठी माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील उपस्थित राहणार असून संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत चंदनापुरी ते शिरापूर रस्त्यावर बांधण्यात येणाऱ्या ३ कोटी २४ लाख ७० हजार रुपये खर्चाच्या पुलाच्या कामाचे भूमिपूजन सायंकाळी ४:३० वाजता चंदनापुरी येथे करण्यात येणार आहे. या पुलामुळे परिसरातील नागरिकांची वाहतूक सुलभ होणार असून शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे.

त्यानंतर सायंकाळी ५:३० वाजता हिवरगाव पावसा येथे निळवंडे प्रकल्पावरील उर्ध्व प्रवरा उजवा कालवा (सा. क्र. ३५७३०) येथे १ कोटी ३२ लाख रुपये खर्चाच्या सी.आर. कम एस्केप (उठ-उीा ऐीलरशि) कामाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या कामामुळे कालव्याच्या पाण्याचे व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार असून परिसरातील शेतीला मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

याच कार्यक्रमांच्या पुढील टप्प्यात सायंकाळी ६:३० वाजता रायतेवाडी फाटा, संगमनेर खुर्द येथे संगमनेर खुर्द ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० दरम्यान बसविण्यात आलेल्या पथदिव्यांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या पथदिव्यांमुळे रात्रीच्या वेळी वाहतूक अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.

या विकासकामांच्या निमित्ताने परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण वाढ होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमास महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संगमनेरात मोबाईल चोर जेरबंद

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर बसस्थानक परिसरात प्रवाशी नागरीकांचे, महिलांचे नेहमीच दागिने, मोबाईल, पैसे चोरी होतात. या ठिकाणावरून अनेकवेळा मोठ्या चोऱ्या झाल्या असतांनाही चोर मात्र सापडत नाही अशी परिस्थिती आहे. मात्र बुधवारी बसस्थानकातून एका महिलेचा मोबाईल व साडेचार हजार रूपये रोख असा ऐवज चोरी झाल्यानंतर शहर पोलीसांनी तपास करत श्रीरामपूर येथील एका ईसमाला अटक केली.

बुधवार २५ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास जयश्री भाऊसाहेब गाडेकर (रा. जनतानगर, संगमनेर) ही महिला बसने प्रवास करत असतांना अज्ञात इसमाने त्यांच्या पर्समधून सात हजार रूपये किंमतीचा रेडमी मोबाईल व साडेचार हजार रूपये रोख असा सुमारे १२ हजार ३०० रूपयांचा ऐवज चोरीला गेला होता. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. याचा तपास सुरू असतांना पोलीसांना खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, एक इसम चोरीचे मोबाईल घेऊन बसस्थानकातील एका मोबाईल शॉपीमध्ये मोबाईल फॉरमॅट करण्यासाठी येत आहे. त्या आधारे पोलीसांनी सागर जगन्नाथ वैद्य (रा. श्रीरामपूर) याला ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून वरील मोबाईल व रोख रक्कम जप्त करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार सदर मोबाईल शॉपीच्या मालकाची देखील चौकशी करण्यात येत आहे.




दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25